# विपश्यना

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष २५५७, आश्विन पौर्णिमा, १८ आक्टोंबर, २०१३ वर्ष २ अंक ८

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**"सब्बे सङ्खारा अनिच्चा"ति, यदा पञ्ञाय पस्सति।**
**अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया॥**

*धम्मपद- २७७, मग्गवग्गो.*

"सर्व संस्कार अनित्य आहेत." (म्हणजे जे काही उत्पन्न होते ते नष्ट होतेच) ह्याला (सत्याला) जेव्हा कोणी (विपश्यना) प्रज्ञेने पाहतो (जाणतो), तेव्हा त्याला दुःखातून निर्वेद प्राप्त होतो, (म्हणजे दुःख-क्षेत्राप्रती भोक्ताभाव नष्ट होतो), असा आहे हा विशुद्धीचा (विमुक्तीचा) मार्ग!



नमन करु गुरुदेवांना! चरणात शिर नमवू।

## पद्मभूषण विश्व विपश्यनाचार्य श्री सत्यनारायणजी गोयन्का यांची अंतिम यात्रा

परम पुज्य गुरुदेव श्री गोयन्काजी यांचे महाप्रयाण ९० वर्षाच्या अवस्थेत रविवार दि. २९ सप्टेंबर २०१३ च्या रात्री १०:४० वाजता घरी (मुंबईत) शांतिपूर्वक झाले. अंतिम समयापर्यंत ते पूर्णपणे सक्रिय, सावध, सचेत व शांत राहिले. जीवनाच्या अंतिम दिवशीही त्यांची दिनचर्या कोणत्याही अडचणीविना पूर्वीप्रमाणेच राहिली.

ह्या महिन्यातही अनेक लोक पूज्य गुरुदेवांना भेटण्यासाठी आले आणि त्यांच्याशी धर्मचर्चा केली. अनेक प्रमुख साधकांव्यतिरिक्त ब्रह्मदेशाचे धार्मिक व सांस्कृतिक मंत्रालयाचे उपमंत्री श्री ऊ सो विन (U Soe Win) व त्यांच्यासोबत चार ब्रह्मी भिक्षू आले. पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात 'ग्लोबल विपश्यना फाऊंडेशन ट्रस्ट ची बैठक झाली. महाराष्ट्राचे होमगार्ड डी. जी. श्री सुरिंदर कुमार सिंह (आय. पी. एस.) येऊन भेटले आणि अमेरिकेचे डॉ. सुखदेव सोनीही.

गुरुदेवांनी आपल्या लेखनासंबधी अनेक महत्वपूर्ण कार्यही पूर्ण केले. आपल्या दैनंदिनीत व इतरत्र लिखित



२६ सप्टेंबरला संघदानाच्या वेळी भिक्षूंच्या सोबत

हिंदी तसेच राजस्थानी ५०० पेक्षा जास्त अप्रकाशित दोह्यांची निवड करून त्यात सुधारणा करविल्या आणि ह्या

दोह्यांना पुस्तकांच्या आगामी संस्करणात जोडण्याचे निर्देश दिले.

पूज्य गुरुदेवांच्या निवासस्थानी २९ सप्टेंबरच्या सकाळपर्यंत मागील दहा दिवसांपासून सून नयनाकडून रोज संघदानाचे आयोजन सुरू होते, ज्यात माताजी आपल्या हाताने संघदान करीत होत्या. ह्यादरम्यान अनेकदा पूज्य गुरुदेवही भिक्षूंना भेटले आणि साधक भिक्षूंना मंगल मैत्री प्रदान केली.

२९ सप्टेंबरला सकाळी फराळाच्या वेळी पूज्य गुरुदेवांनी श्रीप्रकाशला पगोड्याच्या काम-काजाविषयी विचारले तेव्हा ते म्हणाले की आज रविवार आहे. मी तिथे जाईन, परत आल्यावर सर्व माहिती सांगीन.

दुपारचे भोजन करतांना पूज्य गुरुदेवांनी आपल्या जवळ बसलेल्या पूज्य माताजी, पुत्र श्यामबिहारी व श्रीप्रकाशला संबोधित करून म्हटले "आज मी डॉक्टरांना सुट्टी दिली." त्या वेळी त्यांचे हे कथन कोणालाही गंभीर वाटले नाही. परंतु आज सकाळपासूनच असे वाटत होते जसे त्यांनी निश्चय केला असेल की आज शरीर त्यागावयाचे आहे. त्यामुळे जास्तीतजास्त वेळ अंतर्मुखी राहिले. रात्री जेव्हा त्यांचे शरीर नेहमीसाठी उपचार-मुक्त झाले, तेव्हाच पूज्य गुरुदेवांचे वरील कथन, पूर्व संकेताच्या रुपात सर्वांना समजले.

सायंकाळी चहापानानंतर त्यांनी वर्तमान-पत्रांचे आवश्यक शीर्षक वाचले. त्यानंतर खोलीतील खुर्चीवर बसून ध्यान केले. रात्री ९ वाजेनंतर जेवणासाठी आले. जेवणानंतर बहुदा ते श्रीप्रकाशला रोज दिवसभरातील बातम्या विचारायचे आणि विपश्यना अथवा केंद्रांसंबधी गोष्टींवर चर्चाही करायचे. परंतु आज कोणतीही चर्चा केली नाही. आणि सरळ खोलीत निघून गेले.

खोलीत काही वेळ बसून राहिले. त्यानंतर गादीवर झोपविण्यास सांगितले. झोपविण्याच्या काही वेळानंतरच शरीर सोडण्याची क्रिया आरंभ झाली. थोड्या वेळासाठी श्वासांची गती वाढली तेव्हा पूज्य मातांजींनी पुत्र श्रीप्रकाश आणि सून नयनाला बोलाविले. त्यांनी येताच डॉक्टरांना बोलाविले. ह्याच इमारतीतील डॉक्टरांनी येताच एंबुलेंन्स बोलविण्यास सांगितले आणि इस्पितळात आवश्यक तयारी करण्यासही. परंतु पारिवारिक डॉक्टरांच्या येण्यापर्यंत स्थिती नाजुक झाली होती. त्यांनी संकेत दिले की एंबुलेन्सचा फायदा होणार नाही. जेव्हापर्यंत एंबुलेन्स येथे पोहोचेल तेव्हा आम्ही यांना त्यात ठेऊ शकणार नाही. आणि खरोखरच थोड्या वेळातच त्यांनी तपासून सांगितले की ह्यांची हृदयगती बंद झाली आहे. परंतु पूज्य गुरुदेवांच्या चेहऱ्यावर पीडेचे कोणतेही भाव वा चिन्ह नव्हते. ज्या प्रकारे जीवनभर त्यांनी विपश्यना विद्येद्वारे लोकांना जीवन जगण्याची व मरण्याची कला शिकण्याचा उपदेश दिला अगदी त्याच प्रमाणे एका आदर्श गृहस्थ संतांच्या प्रमाणे नेहमीसाठी शरीराचा त्याग केला.

त्या वेळी वातावरणात गहन शांतता पसरली होती. कोणालाही विश्वासच होत नव्हता की ते नेहमीसाठी जग सोडून निघून गेले आहेत. कोणाच्याही तोंडातून रडण्याचा अथवा दुःखाचा एक शब्दही निघाला नाही. ह्या पूर्वी जेव्हा कधी त्यांना जास्त त्रास व्हायचा तेव्हा पूज्यनीय माताजी सहसा रडत असत. परंतु आज माताजींची मनःस्थिती अत्यंत शांत, समतामय आणि प्रेरणादायक होती. त्यांना पाहून खरोखरच हेच वाटले की धर्म किती महान आहे आणि ऐन वेळी कसा काम करतो.

त्यानंतर एक-दोन व्यक्तींना सांगितल्यावर पूर्ण मुंबई शहरातच नव्हे, तर विश्वभरात ही बातमी आगेसारखी सर्वत्र पसरली. रात्रीच लोकांचे फोन व येण्या-जाण्याची रीघ लागली. परिवाराचे अनेक सदस्य विदेशात होते. त्यांना पोहोचण्यात २४ तासांपेक्षा अधिक वेळ लागणे स्वाभाविक होते. त्यामुळे निर्णय घेतला गेला की ३० सप्टेंबरला त्यांचे शरीर काचेच्या स्वयं-शीतल पेटीत ठेऊन घरीच ठेवले जाईल आणि १ आक्टोंबरला दुपारपर्यंत अत्यंष्टी क्रिया संपन्न होईल. हजारो लोकांची गर्दी दिवसभर येत राहिली आणि श्रद्धांजली देऊन लोक जात राहिले.



फोटो ३० सप्टेंबरला घरातील श्रद्धांजली

रात्रीच्या १० वाजताही चार-पाचशे लोक इमारतीच्या बाहेर सडकेवर रांगेत उभे होते. जे आत होते त्यापैकी दूरून आलेले काही लोक खाली बनलेल्या मांडवात रात्रभर थांबले. इतरांना सकाळी येण्यासाठी निवेदन करावे लागले. १ आक्टोंबरच्या सकाळी ६ वाजेपासूनच पुन्हा लोकांचे

येणे-जाणे आरंभ झाले १०:१५ वाजेपर्यंत दर्शनार्थींची लांब रांग लागली होती. १०:१५ वाजता त्यांचे पार्थिव शरीर खाली बनविलेल्या मांडवात आणले गेले आणि तेथेही ११:३० पर्यंत लोक रांगेत उभे राहून आदरांजली देत राहिले.



मांडवातून बाहेर नेतांना पोलीसांची तुकडी



राजकीय सन्मान देतांना पोलीसांची तुकडी

महाराष्ट्र सरकारने राजकीय सन्मानासह पूज्य गुरुदेवांना निरोप देण्याचा निर्णय घोषित केला होता. त्यानुसार सरकारने विशेष पोशाखासह शस्त्र-सज्जित एक पोलिसांची तुकडी पाठविली ज्यांनी पूज्य गुरुदेवांच्या पार्थिव शरीराला राष्ट्रीय ध्वजाने झाकून बैंड-बाज्या, बिगुल आणि तलवार व बंदुकांची सलामी देऊन सन्मान प्रदर्शित केला. ही पोलिसांची तुकडी अंत्येष्टी-गृहापर्यंत पूज्य गुरुदेवांच्या अंतिम यात्रेसोबत गेली आणि अंतेष्टी क्रियेच्या शेवटी पुन्हा बंदुकांची सलामी दिली. सरकारने मोठ्या संख्येने पोलीसांची व्यवस्था केली होती. काही स्वयं-सेवी संस्थांनी मिळून ५-६ किलोमीटर दूर अंतेष्टी-गृहापर्यंत जाण्याच्या मार्गाला सुगम बनविले. काही भिक्षू वाहनांच्या समोर चालत होते, तसेच हजारो लोकांची गर्दी रांगेत शांतभावाने ओशिवारा, जोगेश्वरीच्या (पश्चिम) विद्युत-अंतेष्टी-गृहापर्यंत अंतिम निरोप देण्यासाठी त्यांच्या मागे चालत होती. पोलीस तुकडीने राष्ट्रीय सन्मान देण्यासाठी आणलेला राष्ट्रीय ध्वज पूज्य गुरुदेवांच्या आठवणीला चिरकाळापर्यंत जीवित ठेवण्यासाठी परिवाराला सोपविला.



मुंबईची अंतिम यात्रा, भिक्षूंच्या मागे अन्य लोक

१ आक्टोंबरला सायंकाळी त्यांचा अस्थी कलश जेव्हा ग्लोबल विपश्यना पगोड्यात पोहोचला, तेव्हा पगोड्याच्या मुख्य द्वाराजवळ गाडी थांबल्याबरोबर पावसाची झड लागली, जणू पर्जन्यदेव व अन्य सम्यक देव त्यांचे स्वागत करण्यासाठी पूर्वीपासून तत्पर असावेत.

२ आक्टोंबरच्या सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत नातेवाईक-संबधींची व परिचित लोकांची बैठक जलाराम हॉल, जुहू स्कीम येथे बोलविण्यात आली होती. तेथेही शेकडो लोकांनी पूज्य गुरुदेवांना अंतिम श्रद्धांजली अर्पित केली. २ आक्टोंबरच्या वर्तमान पत्रात ही सूचना प्रकाशित करविण्यात आली की ६ आक्टोंबरला गोराईच्या पगोड्याच्या मुख्य साधना कक्षात सामूहिक साधना ठेवण्यात आली आहे. ह्यात सामील होण्यासाठी लोक दूर-दूरून आले होते. साधना कक्षाच्या मध्यभागी नेहमीप्रमाणे पूज्य माताजी बसल्या आणि जवळच पूज्य गुरुदेवांच्या फोटोच्या समोर अस्थिकलश ठेवला गेला. जवळपास पाच हजार साधकांच्याव्यतिरिक्त अन्य हजारो श्रद्धाळुंनीही आपली श्रद्धांजली अर्पित केली. त्यानंतर अस्थिकलश ब्रह्मदेशात नेण्यात आला.

पूज्य गुरुदेवांची इच्छा होती की त्यांच्या अस्थिअवशेषांना त्यांची जन्मभूमी ब्रह्मदेशात नेऊन इरावती नदीत विसर्जित करावे. त्यामुळे ६ आक्टोंबरच्या रात्री पूज्य गुरुदेवांचे पाच पुत्र श्री बनवारीलाल, श्री मुरारीलाल, श्री श्यामबिहारी, श्री श्रीप्रकाश, श्री जयप्रकाश व त्यांचे तीन नातू तसेच काही अन्य सदस्यांनी अस्थिकलश घेऊन ब्रह्मदेशासाठी प्रस्थान केले. सर्वात मोठे पुत्र श्री गिरधरीलालजी अस्वस्थ असल्यामुळे ब्रह्मदेशाला जाऊ शकले

नाहीत. परंतु येथे मुंबईच्या सर्व कार्यक्रमांत नियमित उपस्थित होते. ७ आक्टोंबरला जवळपास १:३० वाजता विमान मुंबईवरून बैकॉकसाठी रवाना झाले. बैंकॉक विमान तळावर अडीच तासानंतर यांगोंसाठी (रंगून) (ब्रह्मदेश अथवा आधुनिक नाव म्यंमा) विमान बदलवायचे होते.

थाईलैंड येथे विपश्यनेची नऊ केंद्र असल्यामुळे श्रद्धाळुंची संख्या खूप अधिक आहे. त्या सर्वांनी मिळून विमानतळाचे अधिकारी आणि सरकारच्या सहयोगाने लाऊंजमध्येच दोन कक्ष बुक करवून श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम बनविला. अधिकाऱ्यांच्या सहयोगाने जवळपास २० व्यक्तींनी विमानाच्या द्वारापर्यंत जाऊन अस्थिकलश घेऊन उतरणाऱ्यांचे भव्य स्वागत केले. हे लोक व्हिसा घेऊ इच्छित होते. परंतु अधिकाऱ्यांनी पासपोर्ट आपल्या जवळ ठेऊन यांना बाहेर लाऊंजमध्ये जाण्याची अनुमती दिली. तेथे पूर्वीपासूनच पूज्य गुरुदेवांचा फोटो आणि पांढऱ्या कमळांच्या फूलांनी सजविलेल्या मंचावर अस्थिकलश ठेवण्यात आला. संपूर्ण रात्रभर वर्षा होत होती, तरी शेकडोंच्या संख्येने साधक एकत्र झाले होते. त्यांनी एका तासापर्यंत छोट्या-छोट्या समूहात, पाळीपाळीने श्री गोयन्काजींना अंतिम श्रद्धाजली अर्पित करून स्वत:ला धन्य मानले. एक विशेष बाब ही झाली की रात्रभर चालू असलेली जोरदार वर्षा, विमान जमिनीवर उतरल्याबरोबर बंद झाली आणि लोकांनी चैनीचा श्वास घेतला.



थायलैंड विमानतळावरील श्रद्धांजली

७ आक्टोंबरच्या सकाळी यांगों विमानतळावरही अस्थिकलशाचे भव्य स्वागत केले गेले. अस्थिकलशाला एका सुसज्जित वाहनावर ठेऊन विपश्यनेचे प्रथम केंद्र धम्म-जोतीत नेण्यात आले. ब्रह्मदेशात विपश्यनेची वीस केंद्र आणि मोठ्या संख्येत श्रद्धाळू आहेत. सर्व लोक मोठ्या आतुरतेने अस्थिकलशाची प्रतीक्षा करीत होते. तेथे हॉलमध्ये पूर्वीपासून सुसज्जित एका मंचावर अस्थिकलश ठेवण्यात आला आणि रांगेत साधक श्रद्धाजली अर्पित करीत राहिले.

७ आक्टोंबरला २:२७ वाजता म्यंमा मध्ये भूकंपाचे (रेक्टर ३.१) कंपन जाणवले. ह्याला पूज्य गुरुदेव श्री गोयन्काजींची जन्मभूमी म्यंमात (ब्रह्मदेश) निसर्गाद्वारे त्यांच्या शेवटच्या स्वागताचा संकेत मानले गेले. पूज्य गुरुदेव जेव्हा जून १९६७ मध्ये ब्रह्मदेशातून भारतात आले होते तेव्हा भारतातही हलका भूकंप जाणवला होता.




धम्म-जोती यांगोच्या केंद्रावर 'अस्थिकलश'



इरावती नदीत (रंगून) अस्थिविसर्जन

८ आक्टोंबरला सकाळी ९ वाजता ब्रह्मदेशाच्या गोयन्का निवासात ९० भिक्षूंना संघदान दिले गेले. त्यानंतर दुपारी ११ वाजता अस्थिकलशाला धम्मजोतीतून घेऊन सर्व लोक बोटठाऊं जेट्टीवर गेले. तेथे विशेष नौके (मोटर बोट) द्वारे यांगो नदीच्या (इरावती) मध्यभागात जाऊन पूज्य गुरुदेवांच्या पुत्रांनी आणि नातवांनी अस्थिंच्या काही भागाचे

विसर्जन केले. संयोगाने त्याच वेळी ब्रह्मी सरकारने ५६ कैद्यांनाही तुरुंगातून मोकळे केले. अस्थींकलश परत आणून धम्म जोतीवर ठेवण्यात आला.

त्याच दिवशी सायंकाळी ३ ते ५ वाजेपर्यंत हॉटेल रॉयल पार्कच्या बॉलरूममध्ये एक बैठक ठेवण्यात आली, ज्यात ब्रह्मदेशात राहणारे नातेवाईक, संबंधीत, परिचित-मित्र व अन्य श्रद्धाळुजन येऊन आपली श्रद्धांजली अर्पण करीत राहिले.

९ आक्टोंबरच्या सकाळी धम्म-जोतीमधून अस्थिकलश घेऊन विमानांद्वारे यांगोपासून मचीनासाठी रवाना झाले. तेथे उतरून मचीनाच्या इरावतीत (जेथून नदी आरंभ होते तेथे) अस्थींचा काही भाग विसर्जित केला गेला. ह्या सर्वांना अस्थिकलश घेऊन त्याच दिवशी मांडलेला परत जायचे होते, म्हणून त्या विमानाला ह्यांच्या परतण्यापर्यंत जवळपास अडीच तास थांबावे लागले, रुटीन नुसार त्याला अर्ध्यातासातच परत फिरावे लागते.



मचीनात रथ-यात्रा



मचीनाच्या इरावती नदीत अस्थिविसर्जनासाठी जातांना.

ह्या विमानाने हे लोक मांडलेत परत आले आणि कलशाला विपश्यना केंद्र धम्म मंडल मध्ये ठेवण्यात आले. ज्यामुळे श्रद्धाळू लोक आपली श्रद्धांजली अर्पित करु शकतील. सायंकाळी ब्रह्मदेशाचे प्रसिद्ध भिक्षू भदंत ञाणीसारजी (सितगू सयाडो) यांनी पुढच्या दिवसाचा पूर्ण कार्यक्रम निश्चित करुन सर्वांना समजविला. मांडले राज्याचे मुख्यमंत्री आणि ब्रह्मदेशी सरकारचे धार्मिक व सांस्कृतिक मंत्रालयाचे मंत्री व मांडलेचे पोलिस कमिशनर यांनी संध्याकाळीच तेथे पोहचून साऱ्या कार्यक्रमाचे अवलोकन करुन समर्थन केले. त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना आदरणीय भंतेजींच्या इच्छेनुसार काम करण्याचे निर्देश दिले.



मांडलेत रथयात्रा



ग्लोबल पगोडा, गोराई, मुंबईच्या साधना कक्षात सामूहिक साधना



मांडलेच्या इरावती नदीत नौकांचे दृश्य

१० आक्टोंबरला सकाळी ९ वाजता आदरणीय भिक्षुंसाठी संघदानाचे आयोजन होते. भोजन वाढण्याअगोदर

सुत्तपाठाच्या नंतर भदंत त्राणीसारजींनी पूज्य गुरुदेवांच्या बाबतीत ब्रह्मी भाषेत विस्तृत प्रवचन दिले. (ह्याचा अनुवाद झाल्यावर भविष्यात प्रकाशित करण्यात येईल.) ह्यानंतर मोठ्या संख्येने एकत्र झालेल्या सर्व आगंतुकांनाही भोजन दिले गेले. त्यानंतर यात्रा आरंभ होण्याअगोदर भदंत त्राणीसारजींनी सर्व भिक्षूंना निर्देश दिले की ते खालील पालिपदाचा पाठ यात्रेच्या आरंभापासून ते अंतापर्यंत सतत करत राहोत, ज्याचा अर्थही खाली दिला आहे-

**अनिच्चा वत सङ्खारा, उप्पादवयधम्मिनो।**
**उप्पज्जित्वा निरुज्झन्ति, तेसंवूपसमोसुखो॥**

*– दीघनिकाय २.२२१, महापरिनिब्बानसुत्तं*

खरोखर!सारे संस्कार अनित्यच आहेत. उत्पन्न होणाऱ्या सर्व स्थिती, वस्तू, व्यक्ती अनित्यच आहेत. उत्पन्न होणे आणि नष्ट होणे, हा तर यांचा धर्मच आहे, स्वभावच आहे. विपश्यना साधनेच्या अभ्यासाव्दारे उत्पन्न होऊन निरुध्द होणाऱ्या ह्या प्रपंचाचे जेव्हा पूर्णपणे उपशमन होते- पुन्हा उत्पन्न होण्याचा क्रम समाप्त होतो, त्याचेच नाव परम सुख आहे, तेच निर्वाण-सुख आहे.

ह्या प्रकारे दुपारनंतर शाही सरंजाम आणि सन्मानासह कलश - यात्रा आरंभ झाली. सोनेरी हंसाची आकृती असणाऱ्या विशेष वाहनावर अस्थिकलश ठेवण्यात आला. त्यामागे गोयन्का परिवाराच्या गाड्या होत्या. त्यामागे भिक्षू-भिक्षुणी आणि विपश्यनेचे आचार्यगण होते, त्यामागे मीडिया आणि शेवटी जनसामान्याच्या गाड्या होत्या. कार्यक्रम निश्चित करतांना केवळ ६९ गाड्या उपस्थित होत्या परंतु यात्रा आरंभ होण्याच्या वेळी जवळपास ३०० गाड्या झाल्या.

जवळपास दिड-दोन तासांची ही यात्रा इरावतीच्या पमादी जेट्टी तटावर पोहोचली. तटावर पाच विशेष सज्जित मोठ्या नौकांची (मोटार बोट ) व्यवस्था केली गेली होती. एकावर अस्थिकलशासह परिवाराचे लोक आणि विपश्यनेचे आचार्यगण होते, दुसरीवर केवळ भिक्षू , तीसरीवर केवळ भिक्षुणी, चौथीवर मीडियाचे लोक आणि पाचवीवर अन्य साधक-साधिका चढून नदीच्या मध्य भागात अस्थिविसर्जनासाठी गेले. विसर्जनाच्या वेळी अंधार होऊ लागला होता. त्या दिवशी दुपारी १२ वाजेपासून ते ७ वाजेपर्यंत सरकारने अन्य सर्व नौकांना-जहाजांना त्या क्षेत्रात जाण्यापासून अडविले होते.

सर्व नौकांनी चारी बाजूला फिरुन गोलाकार आकृती बनविली आणि सगळ्यांनी एकसाथ एक हजार तरंगणारे मेणाचे दिवे जाळून नदीत प्रवाहित केले. हे भव्य दृश्य संध्याकाळच्या अंधारात अजुनच भव्य झाले. रंगीत आवरण लावलेले हे दीप नदीच्या धारेत हालत पसरले, जणू देवलोकाचे देवगण प्रसन्न होऊन नाचत आहेत. अनेक प्रकारची आतिशबाजी केली गेली जी जल स्तरापासून आकाशापर्यंत अद्‌भुत दृश्य उपस्थित करीत होती.

शेवटी भदंत त्राणीसारजींनी म्हटले की असे भव्य स्वागत आजपर्यंत कधी कोणाचे झाले नाही, तसेच असा निरोप अन्य कोणाचा होण्याची संभावना नाही. भदंत त्राणीसारजींनी हे ही म्हटले की १९६९ मध्ये ऊ गोयन्काच्या माध्यमाने इरावती तटावरुन जी धर्मगंगा भारतात गेली होती ती अस्थिकलशाच्या रुपाने २०१३ मध्ये परत येऊन हिच्यातच विलीन झाली. तरीही धर्मप्रसारणाचे कार्य विश्वभरात चालत राहील. रात्री हे सर्व लोक मांडलेत राहिले.

११ आक्टोंबरला सकाळी गोयन्का परिवाराचे लोक विमानाव्दारे मांडलेतून रंगूनला परत आले आणि त्याच दिवशी संध्याकाळच्या विमानाने बैंकॉकवरुन रात्री जवळपास २ वाजता मुंबईच्या आपल्या घरी पोहोचले.

१२ आक्टोंबरच्या सकाळी भिक्षूंना आमंत्रित करुन संघदान दिले गेले. ह्या प्रसंगी परिवाराचे सर्व सदस्य व संबधित उपस्थित होते. सर्व संघदानात सामील होऊन खूप प्रसन्न झाले.

संघदानाचे आयोजन १३ लाही ठेवण्यात आले. ह्या प्रकारे विपश्यनेव्दारे विश्वाला शुद्ध धर्माची अनुभूती करविणाऱ्या एका गृहस्थ संतांला भावनात्मक श्रध्दांजलीसह अंतिम निरोप देण्यात आला.

पूज्य गुरुदेव आपल्या भौतिक कायेने जरी आमच्यापासून दूर गेले, तरी त्यांची धर्मभूत काया, त्यांची वाणी, त्यांची दिव्य ठेव ह्या सदैव आमच्या सोबत राहतील. आता हे आमचे कर्तव्य आहे की ह्या अनमोल विद्येला आपल्या जीवनाचे अंग बनवावे आणि जास्तीत-जास्त लोकांना धर्मलाभ घेऊ शकण्यात सहायक बनावे.

धर्म धारण करु तर आपसात सौहार्द कायम राहील आणि आपल्या सोबतच अन्य अनेकांचेही मंगल-कल्याणात सहायक होऊ. सर्व लोक मिळून पूर्ण विश्वात पूज्य गुरदेवांच्या धर्म-प्रसारणाच्या लक्षाला पूर्ण करु, तेव्हाच खऱ्या अर्थाने त्यांच्या प्रती आमची खरी श्रध्दांजली होईल. तेव्हाच आम्हा सर्वांचे खरे मंगल साधेल आणि खऱ्या अर्थाने धर्म आमचे कल्याण करेल.

**भवतु सब्ब मंगलं!**

## कृतज्ञता ज्ञापन

विपश्यनाचार्य श्री सत्यनारायणजी गोयन्का यांच्या देहावसानावर आपला संवेदना संदेश प्राप्त झाला. सर्वांना वेगवेगळे पत्र लिहिणे शक्य नसल्यामुळे ह्या पत्रिकेच्या माध्यमाने आपणा सर्वांचे आभार व्यक्त करीत आहोत. आपल्या अंतर्मनाला निर्मळ करुन शुद्ध धर्माला धारण करण्याची त्यांनी जी अनमोल'विपश्यना' विद्या शिकविली तिच्या नियमित, निरंतर अभ्यासातच सर्वांचे मंगल कल्याण सामावले आहे आणि हेच करणीय आहे.

पुन्हा एकदा धन्यवाद देऊन, मंगल कामनांसह,

**इलायचीदेवी गोयन्का**
**व समस्त गोयन्का परिवार**

## अलविदा गुरुदेवजी

परम पूज्य गुरुदेवांच्या देह-त्यागाने जी रिक्तता निर्माण झाली, तिला भरणे असंभव आहे. परंतु ह्यासाठी मागील काही महिन्यांपासून ते आपल्या आवश्यक कामांना व्यवस्थित करण्यात लागले होते. ज्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्याव्दारे स्थापित धर्मकार्य योग्य तऱ्हेने सुव्यवस्थित रीतीने चालत राहावे. ह्यासाठी त्यांनी अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आणि आपल्या जवळील सेवकांना आवश्यक मार्गदर्शनही केले.

विपश्यनेच्या प्रशिक्षणासंबधी आणि विपश्यना केंद्राच्या संचालनासंबधी सुस्पष्ट निर्देश दिले, जे मागील डिसेंबर,२०१२ च्या पत्रिकेत व न्यूजलेटर मध्ये प्रकाशित झाले. ह्यानंतरही अनेक स्पष्टीकरण आणि निर्देश देत राहिले.

मागील काही महिन्यांपासून अशी सूची तयार करविली ज्यात विपश्यनेसंबधी संशोधनाचे अनेक विषय अंकित आहेत. विपश्यना विशोधन विन्यासला ह्यावर शोध व संशोधन करण्यात अनेक वर्ष लागतील. पाली भाषा आणि साहित्याला शताब्दीपर्यंत सुरक्षित ठेवण्याची सारी व्यवस्था आपल्या उपस्थितीत आणि निगराणीत ह्यापूर्वीच तयार करविली होती.

आपले गुरुदेव सयाजी ऊ बा खिनांच्या प्रती प्रतिबध्दता आणि समर्पण, म्यंमाच्या प्रती सम्मान आणि कृतज्ञता, भगवान बुध्दांच्या प्रती अनन्य भक्ती आणि सन्मान प्रकट करण्यासाठी व भगवान बुध्दांची खरी शिकवण लोकांना अवगत करविण्यासाठीच त्यांनी आपल्या समजदारीचा उपयोग करुन एका भव्य पगोड्याचे निर्माण करविले. ह्याचे भविष्य सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी एका **'कार्पस-फंडाच्या'** योजनेचा सल्ला दिला ज्यामुळे चिरकाळापर्यंत हा पगोडा लोकांना सध्दर्माकडे आकर्षित करीत राहील. लोक येथे येऊन प्रेरणा घेत राहातील. त्यांना विश्वास होता की ह्या 'कार्पस-फंड'योजनेत गरीब-श्रीमंत सर्व प्रकारचे त्यांचे साधक-साधिका भाग घेतील आणि पगोड्याला दीर्घकाळापर्यंत सुरक्षित ठेवण्यात सहयोग देतील. ह्या प्रकारे हा अनेक शतकांपर्यंत लोकांना मार्गदर्शन करीत राहील.

गुरुदेवांनी केवळ एका सप्ताहापूर्वी 'विपश्यना विशोधन विन्यास'आणि 'ग्लोबल विपश्यना पगोडा'च्या विस्ताराच्या योजनांवरही महत्वपूर्ण प्रकाश टाकला. जेव्हा हे सर्व होत होते तेव्हा कोणाच्याही मनात हा भाव आला नाही की ही सर्व त्यांची निरोप घेण्याची तयारी आहे. मागील पंचवीस वर्षांपासून मी त्यांना धर्मकार्यात खूपच उत्साहित पाहिले होते. मनात आताही तीच निश्चितता होती की अजून दहा वर्षांपर्यंत तरी ते आम्हाला मार्गदर्शन करीतच राहतील.

परंतू मागील काही महिन्यांच्या घटनांबाबत विचार केल्यावर हेच प्रतीत होते की वर्षांपूर्वीचे मार्गदर्शन आणि आजच्या मार्गदर्शनात अंतर होते. ते आपल्या सहायकांना अजून अधिक जबाबदार बनवून भविष्याची मोठी महत्वपूर्ण रुपरेखा सुनिश्चित करीत होते.

आध्यात्मिक जगाच्या एका महानतम व्यक्तीने प्रत्यक्षरुपाने जरी निरोप घेतला असला तरी, त्यांच्या दाखविलेल्या पथाचे आणि निर्देशांचे अनुसरण करीत आम्ही त्यांना सदैव आपल्या समीपच पावू.

प्रमुख आचार्याच्या रुपाने पूज्य माताजी आता आमच्या सोबत आहेत ज्या जवळपास ७० वर्षांपासून सावली-प्रमाणे गुरुदेवांच्या सोबत राहिल्या आहेत, त्यांच्या प्रत्येक कार्यात सहयोग दिला आहे आणि त्यांच्या निकटतम सान्निध्यात सहभागी राहिल्या आहेत. त्यांना नम्र आग्रहपूर्वक विनंती आहे की जरी आज आमच्या डोक्यावरुन एक मोठे छत्र निघून गेले आहे, परंतु माताजींची छत्रछाया आणि मार्गदर्शन आमच्या सोबत राहावे.

ज्या प्रकारची श्रध्दांजली आपल्या गुरुदेव सयाजी ऊ बा खिनांना पूज्य गुरुजींनी दिली होती, म्हणजे आपले सारे जीवन धर्म-प्रसारणाच्या कार्यात लावले होते, तसेच आम्हीही आपले सर्वस्व अर्पित करुन धर्मपथावर चालण्यात, त्याची शुध्दता कायम राखण्यात आणि भविष्यांच्या पिढ्यांना त्याच शुध्दतेसह सोपविण्यात प्रतिबध्द होऊ, तेव्हाच त्यांच्या प्रती आमची खरी श्रध्दांजली होईल.

(एक श्रध्दाळू साधिका)

## सयाजी ऊ बा खिनांच्या पुण्यतिथीनिमित्त पूज्य माताजींच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

**१९ जानेवारी,** २०१४, **रविवार, वेळ;** सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा'** च्या मोठ्या धम्मकक्षात (डोम). **३ वाजता पूज्य गुरुजींच्या रेकार्डेड प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात.** कृपया खालील फोन नंबरांवर अथवा ईमेलने त्वरित संपर्क करावा. **कृपया बुकिंग केल्याविना येवू नये. बुकिंग संपर्क;** मो. 09892855692, 09892855945, फोन नं.: 022-28451170,33747543,33747544, (**फोन बुकिंगः** सकाळी **११** ते सायं. **५** वाजेपर्यंत, रोज)

**ईमेल Regn: oneday@globalpagoda.org**
**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

## नव नियुक्तिया

### सहायक आचार्य

१. डॉ. आदिल इरानी, अमेरिका
२. श्रीमती उज्वला खंते, अमेरिका
३. श्री उमेश गिरि, अमेरिका
4. Ms. Paola O'Sullivan, UK

### बालशिविर शिक्षक

१. श्री हेमचंद सावला, कच्छ
२. कु. रेचल हॉमरलिन, कच्छ (USA)
३. श्रीमती बढीबेन बेरा, कच्छ
४. श्री वासुदेव जडेजा, कच्छ
५. कु. मंजुला संपत, कच्छ
६. कु. समता सोलंकी, कच्छ
७. श्री जनकराय भट्ट, कच्छ
८-९. श्री कल्पेश एवं श्रीमती तृप्ति गोस्वामी, कच्छ
१०. श्री धर्मेंद्र सोमकुँवर, भोपाल
११. श्रीमती चंद्रकांता जांभुलकर, भुसावल
१२. श्रीमती विद्या उमाले, भुसावल
13. Mrs. Mary Knox, Australia
14. Ms.Maria Cheung Sze Yuen, Hong Kong
15. Ms. Erlina Zheng, Indonesia

## विपश्यना विशोधन विन्यास ग्लोबल पगोडात पालि अभ्यासक्रम – २०१४

ग्लोबल पगोडात निवासी पाठ्यक्रम पालि व्याकरण, सुत्त, सैध्यान्तिक, "विपश्यना इत्यादी, निवासी पाठ्यक्रम (परियत्ती आणि परियत्ती)

**३० दिवसीय प्रारंभिक पालि-हिंदी वेळ** २०-०१-२०१४ से २०-२०-२०१४ पर्यंत आवेदन पत्र जमा करण्याची रोवटची तारीख १०-०१-२०१४

**९० दिवसीय पाठ्यक्रम-पालि-इंग्रजी, वेळ** ०१-०६-२०१४ ते ३०-०८-२०१४ फक्त पुरूषांसाठी आवेदन पत्र जमा करण्याची शेवटची तारीख ३० एप्रील २०१४

**६० दिवसीय पाठ्यक्रम– पालि-इंग्रजी वेळ** १०-१०-२०१४ ते १०-१२-२०१४ पर्यंत, आवेदन पत्र जमा करण्याची शेवटची तारीख ०१-०९-२०१४ **सर्वासाठी कॉम्युटर वर आवेदन पत्र** www.vridhamma.org वरून ही पाठवू शकता.

*प्रवेश योग्यता:-* (१) ज्या साधकांनी कमीत कमी **तीन १० दिवसाचे शिबिर** तसेच एक सतिपट्ठान शिबिर केलेले आहे. (२) एक वर्षापासून नियमितपणे दोन तासांची दैनिक साधना करणारे. (३) एक वर्षापासून पंचशीलाचे कडकपणे पालन करणारे आणि (४) कमीत कमी १२ वी इयत्ता पास झाल्याचे प्रमाणपत्र असले पाहिजे।

**संपर्क –** विपश्यना विशोधन विन्यास (VRI) ग्लोबल विपश्यना पगोडा एस्सेल वर्ड जवळ, बोरिवली (पश्चिम) मुंबई – ४०००९१

**अधिक माहितीसाठी संपर्क करा –**
डॉ. शारदा संघवा – फोनः (२३०९५४१३) ९२२३४६२८०५,
**ईमेलः mumbai@vridhamma.org,**
**director@vridhamma.org;**
२) श्रीमती बलजीत लाम्बा : फोनः ०९८३३५१८९७९;

### दोहे धर्माचे

**गुरुवर! तुमचा आसरा, तुमचाची आधार।**
**तुमच्या छत्र छायेमध्ये, हो भवसागर पार॥**

**बोधिसत्व गुरुदेवने, पकडला असा हात।**
**मुक्ती दायकच पथ दिला, बोधिवृक्षाची साथ॥**

**गुरुवर तुमच्या पुण्याचा, हा प्रबळ प्रताप।**
**जागे बोध अनित्याचा, दूर होय भव-ताप॥**

**धर्म दिला गुरुदेवने, रत्न अनमोल कसे।**
**मृत्युलोकाच्या जीवा, अमृत घोळून जसे॥**

**गुरुवरची संगत मिळे, मिळे धर्माचा सार।**
**जीवन सफलच बवविले, डोई उत्तरे भार॥**

### दोहे धर्माचे

**गुरुसम साबण मिळाला, अतरंगास धुण्या।**
**मिळो ज्योत सद्धर्माची, मनी उजेड होण्या॥**

**गुरुवरा तुझ्या पुण्याचा, हा प्रवळ प्रताप।**
**जागे बोध अनित्याचा, दूर करी भवताप॥**

**गुरुदेव उपदेशाने, मुर्ख बने विद्वान।**
**लोखंड बनते सोने, दगड परीसच जाण॥**

**सुखी जीवन जगण्याची, विद्या तूच शिकविली।**
**गुरुवर तुझीच कृपा, दुखे ती मिटविली॥**

**अनित्य बोधीनी गंगेत, बुडी लागताच जाय।**
**उतरावी मन कालिमा, शुध्दी वाढतच जाय॥**


**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org